# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक १२ मार्च, २०२५ / फाल्गुन २१, १९४६ (शके)**

**(१) मुख्यमंत्री**
**(२) पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री**
**(३) इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धव्यवसाय विकास, अपारंपारिक ऊर्जा मंत्री**
**(४) पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री**
**(५) माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री**
**(६) परिवहन मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३३**

---

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षा मराठी भाषेतून घेण्याबाबत

**(१) * ११० श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षा इंग्रजी भाषेतून घेण्यात येत असल्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी फार कमी प्रमाणात सहभागी होत असून त्यांची इंग्रजीची भीती दूर करण्याकरीता भाषा संचालनालयाच्या माध्यमातून यापुढील काळात प्रत्येक परीक्षा मराठीतून घेण्याविषयीचे धोरण राज्य शासनाने ठरवावे, असे निर्देश औरंगाबाद खंडपीठाने दिनांक १ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या उक्त निर्देशाची अंमलबजावणी सुमारे दोन वर्षानंतर देखील शासनाने केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या उक्त निर्देशांची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने मराठी भाषेतूनही परिक्षा घेण्याची शक्यता तपासणे व याबाबत धोरण ठरविणे हे अंतरीम आदेश दिनांक १ सप्टेंबर, २०२२ रोजी दिले आहेत.

(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या वस्तुनिष्ठ बहुपर्यायी परीक्षा या मराठी व इंग्रजी अशा दोन्ही माध्यमामधून घेतल्या जातात.

(३) व (४) मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येत असल्याने प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## टोरेस ज्वेलरी ब्रँड चालविणाऱ्या प्लॅटीनम हर्न प्रा. लि. कंपनीने गुंतवणूकदारांची कोटयवधी रुपयांची फसवणूक केल्याबाबत

**(२) * ३०१ श्री.शशिकांत शिंदे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.अरुण लाड, श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.हेमंत पाटील, श्री.विक्रांत पाटील, डॉ.परिणय फुके, श्री.सचिन अहिर, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई तसेच नवी मुंबई येथे 'टोरेस' या ज्वेलरी ब्रँडच्या विविध दागिन्यांच्या विक्रीसह गुंतवणूकीचा व्यवसाय करणाऱ्या प्लॅटीनम हर्न प्रा. लि. या कंपनीने गुंतवणूकीवर दर आठवड्याला १० टक्के परतावा देण्याच्या प्रलोभनाने सव्वा लाखांहून अधिक गुंतवणूकदारांची कोटयवधी रुपयांची फसवणूक केली असून गुंतवणूकदारांना दिलेले हिरे ही खोटे असल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीच्या दादर, गिरगांव, कांदिवली, कल्याण, सानपाडा, मीरा रोड या सहा ठिकाणी शाखा असून कंपनीचे संचालक सर्वेश सुर्वे, व्हिक्टोरिया कोवालेन्को, तौफिक रियाज कार्टर, तानिया कॅसोतोवा आणि व्हॅलेटीना कुमार हे फरार झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी आर्थिक फसवणूक झालेल्या गुंतवणूकदारांनी पोलीस ठाण्यामध्ये कंपनीविरूध्द तक्रारी दाखल केल्या असून, या कंपनीच्या संचालकांसह अन्य पाच जणांवर आर्थिक गुन्हे शाखेत कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने टोरेस या कंपनीमध्ये गुंतवणूकदारांचे पैसे परत मिळण्याकरीता तसेच विदेशी कंपनीच्या मालकांविरुध्द कारवाई करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय,अंशत: खरे आहे.

मुंबई तसेच नवी मुंबई येथे "टोरेस" हा ज्वेलरी ब्रँड चालविणाऱ्या प्लॅटीनम हर्न प्रा. लि. कंपनीने गुंतवणूकदारांना दर आठवड्याला मुंबई येथे ६ ते ११ टक्के आणि नवी मुंबई येथे २ ते ९ टक्के परतावा देण्याचे आमिष दाखविल्याची बाब दिनांक ०६/०१/२०२५ रोजी निर्दशनास आली. कंपनीकडून मुंबई येथे १२,८५८ गुंतवणूकदारांची रुपये १३१.३४ कोटी इतक्या रकमेची आणि नवी मुंबई येथे १,०११ गुंतवणूकदारांची रुपये १३,०९,९४,१३५/- इतक्या रकमेची आर्थिक फसवणूक झाली असल्याचे आतापर्यंतच्या तपासात निष्पन्न झाले आहे. गुंतवणूकदारांना देण्यात आलेल्या खड्यांच्या पावतीमध्ये मोझोनाईट / मोसेनाईट असे लिहीलेले आहे.

(२) होय. अंशत: खरे आहे.

सदर कंपनीची दादर, गिरगांव, कांदिवली, कल्याण, सानपाडा, मीरा रोड या ठिकाणी दालने असून येथील फसवणूक झालेल्या गुंतवणूकदारांच्या तक्रारींमुळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांनी कंपनीचे संचालक सर्वेश सुर्वे, तौफिक रियाज कार्टर, तानिया कॉसोतोवा आणि व्हॅलेटीना कुमार यांना अटक केली असून आरोपी व्हिक्टोरिया कोवालेन्को फरार झाली आहे.

(३) गुंतवणुकदारांनी आश्वासित परतावा न दिल्याने आणि त्याबाबतीत तक्रार दाखल केल्याने शिवाजी पार्क पोलीस स्टेशन, मुंबई, एपीएमसी पोलीस स्टेशन, नवी मुंबई, राबोडी पोलीस स्टेशन, ठाणे आणि नवघर पोलीस स्टेशन, मिरा-भाईंदर-वसई-विरार आयुक्तालय येथे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांनी कंपनीविरुध्द भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८(४), ३१६(५), ३१७(२), ३१७(४), ३१७(५), ६१ सह महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम, १९९९ चे कलम ३ व ४ अन्वये गुन्हा दाखल केलेला आहे.

(४) विविध ठिकाणी दाखल गुन्ह्यांमध्ये आतापर्यंत १३ आरोपींतांना अटक करण्यात आली आहे. इतर पाहिजे आरोपीतांचा शोध सुरु असून परदेशात पळून गेलेल्या आरोपीतांविरुध्द ब्ल्यु कॉर्नर नोटीस जारी करण्यात आली आहे गुंतवणूकदारांचे पैसे परत मिळण्याकरीता टोरेस कंपनींच्या शोरूमची /कार्यालयाची तसेच अटक आरोपीतांची घरझडती घेवून, त्यामध्ये मिळून आलेली रोख रक्कम, मौल्यवान वस्तू व फर्निचर हस्तगत करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत काढण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत अनियमितता झाल्याबाबत

**(३) * ४३३ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अंबादास दानवे, श्री.विक्रांत पाटील, श्री.सचिन अहिर, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, ॲड.अनिल परब, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.अमोल मिटकरी, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या राज्य मार्ग परिवहन महामंडळाने प्रचलित पध्दतीनुसार विभागनिहाय गाड्या घेण्याची पध्दत बंद करून सर्व विभागांची केवळ तीन समूहांमध्ये विभागणी करून प्रत्येक समूहात किमान ४००-४५० या प्रमाणे सात वर्षांसाठी १३१० बस गाड्या भाडे तत्वावर घेण्याचा निर्णय घेतला असल्याचे तसेच सर्व विभागांची केवळ एकत्रित निविदेनूसार तीन समुहात (क्लस्टर) बसगाड्या पुरविण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निविदेमध्ये दिल्ली येथील मे.सिटी लाईफलाईन ट्रॅव्हल्स प्रा.लि. कंपनी, केरळ येथील मे.अँथोनी रोड ट्रान्सपोर्ट सोल्युशन प्रा.लि. कंपनी, गुजरात येथील मे. ट्रॅव्हल्स टाईम प्रा.लि. कंपनी व राज्यातील राजमुद्रा कंपनीने सहभाग नोंदविला असून राज्यातील कंत्राटदार कंपनीने डिझेल खर्चासहित देण्यात आलेल्या दरापेक्षा बाहेरील राज्यातील कंपनीने डिझेल दर वगळून देण्यात आलेले प्रति दर जास्त

असताना सुध्दा महामंडळाकडून राज्याबाहेरील कंपन्यांना कंत्राट देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने मान्यता दिलेल्या मूळ प्रस्तावामध्ये महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी अटी व शर्तीं मध्ये बदल करून तीन समूहांसाठी (क्लस्टर) निविदा काढून त्या शासन मान्यतेविना महामंडळ स्तरावर अंतिम केल्याने डिझेलच्या खर्चाचा भार महामंडळावर पडला असून एकूण होणाऱ्या खर्चापेक्षा राज्य शासनाच्या वर्षभराच्या खर्चामध्ये रुपये २००० कोटींचा निधी जास्त खर्च होणार असल्याने त्याची चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांचेकडून परिवहन विभागाचे सचिव यांच्याकडे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत भाडेतत्वावर बस घेण्यासाठी काढण्यात आलेल्या निविदेप्रक्रियेमध्ये अनियमितता झाली असल्याने सदर निर्णयास मा.मुख्यमंत्री यांनी माहे, जानेवारी २०२५ मध्ये स्थगिती दिलेली असून त्याप्रकरणी परिवहन विभागाच्या अप्पर सचिवांमार्फत चौकशी करण्याचे आदेश दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जास्तीचे दर आकारणी करण्यात आलेली निविदाप्रक्रिया रद्द करुन पुर्ननिविदा प्रक्रिया राबविण्याबाबत तसेच शासनाच्या मान्यता देण्यात आलेल्या प्रस्तावामध्ये बदल करुन अनियमितता करणाऱ्या राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अधिकारी व कर्मचारी यांना निलंबित करुन त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) होय.
(२) राज्यातील राजमुद्रा कंपनीने निविदा प्रक्रियेत सहभाग नोंदविलेला नाही.
(३), (४), (५) व (६) राज्य परिवहन महामंडळामार्फत १३१० बस गाड्यांच्या खरेदी प्रकियेत अनियमिता झाल्याबाबत तक्रार प्राप्त झाल्याने चौकशी करुन सदरची प्रक्रीया रद्द करण्यात आली आहे.

-----------------

## चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रातून प्रदूषण होत असल्याबाबत

**(४) * ५२८ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रातील युनिट क्रमांक ८ व ९ च्या चिमणीतून राख पडत असल्यामुळे मागील काही महिन्यांपासून प्रदूषण करणाऱ्या कंपनीकडून केवळ पाच लाख रुपयांचा दंड आकारुन सदरहु कंपनीवर कार्यवाही केली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चंद्रपूर शहर परिसरात वीज केंद्रातील चिमणीतून कोळशाच्या निघणाऱ्या राखेमुळे प्रदूषण होत असून त्यामुळे लोकांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत असल्याने सदरची चिमणी बंद करुन प्रदूषण रोखण्याची मागणी परिसरातील स्थानिक नागरिकांनी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रदूषणाचा लोकांच्या आरोग्यावर परिणाम होऊ नये यादृष्टीने चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रातून होणारे प्रदूषण रोखण्याकरीता तसेच नागरिकांच्या आरोग्यावर कोणताही विपरित परिणाम होऊ नये यासाठी चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रातील युनिट क्रमांक ८ व ९ बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१)अंशत: खरे आहे.तथापि, चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रातील युनिट क्र. ८ व ९ च्या चिमणीतून जास्त प्रमाणात होत असलेल्या धुलीकणांच्या उत्सर्जनाच्या अनुषंगाने सदर महाऔष्णिक विद्युत केंद्राची रुपये १५.०० लक्षची बँक हमी दिनांक १२/११/२०२४ रोजीच्या पत्रान्वये जप्त करण्यात आली आहे.
(२) हे खरे आहे. याबाबत नोव्हेंबर-२०२४ मध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास तक्रार प्राप्त झाली होती.
(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक १३/१०/२०२४ रोजी केलेल्या पाहणीदरम्यान आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने, सदर उद्योगास दिनांक १८/१०/२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तावित निर्देश पारीत केले आहेत. तसेच दिनांक १२/११/२०२४ रोजीच्या पत्रान्वये रुपये १५.०० लक्षची बँक हमी जप्त करण्यात आली आहे.

सदरील ठिकाणाच्या दिनांक २१/०२/२०२५ रोजीच्या पाहणीदरम्यान संच क्र.९ बंद असल्याचे आढळून आले. तसेच, दिनांक १८/१०/२०२४ रोजीच्या प्रस्तावित निर्देशांच्या अनुषंगाने अनुपालन सुरु असल्याचे दिसुन आले. सदर उद्योगाने दिनांक ३०/१०/२०२४ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या अनुपालन अहवालानुसार सायलोमधील गळती बंद करणे, इएसपीची दुरुस्ती करणे, वॉटर स्प्रिंकलर लावणे, इ. कामे केलेली आहेत. इलेक्ट्रो स्टॅटीक प्रेसिप्रीटेटर या वायू प्रदूषण नियंत्रण संयंत्रणेची दुरुस्ती केली आहे. संच क्र. ८ व ९ च्या सायलोचे बॅग फिल्टर्स नवीन बसविण्यात आले. धुरांड्यातील उत्सर्जन कमी झाले असल्याचे निदर्शनास आले. ऑनलाईन सतत उत्सर्जन तपासणी यंत्रणेच्या अहवालानुसार सदर संच क्र.८ च्या धुरांड्यातील धुलीकणांचे प्रमाण विहित मर्यादेत आढळुन आले.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भुसावळ (जि.जळगाव) शहरात हत्येच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याबाबत

**(५) * ९३२ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुसावळ (जि.जळगाव) शहरात एका तरुणाची गोळ्या झाडून हत्या करण्यात आल्याची बाब दिनांक १० जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने जळगाव जिल्ह्यात अशा वारंवार घडणाऱ्या घटनांवर निर्बंध घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी भुसावळ बाजारपेठ पोलीस ठाणे येथे दिनांक १०/०१/२०२५ रोजी गु.र.क्र. १४/२०२५, भारतीय न्याय संहिता कलम १०३(१), ६१(२), ३५१(२)(३), ३५२, ३(५) सह शस्त्र अधिनियम कलम ३/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी एकूण ७ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. या सर्व आरोपींना दिनांक १९/०१/२०२५ रोजी न्यायालयीन कोठडी मंजूर करण्यात आली आहे व गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

जळगांव जिल्हा घटकात तसेच भुसावळ शहरात वारंवार घडणाऱ्या घटनांवर आळा घालण्यासाठी जळगाव पोलीसांमार्फत गर्दीच्या व सार्वजनिक दृष्ट्या महत्वाच्या ठिकाणी नियमीत पेट्रोलिंग सुरु असून अचानकपणे ऑलआऊट कोंम्बिंग ऑपरेशन राबवून सराईत गुन्हेगारांवर नियमित लक्ष ठेवण्यात येत आहे. त्याचप्रमाणे सराईत गुन्हेगार व आरोपींवर मोठ्या प्रमाणावर MPDA, हद्दपार तसेच प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात केलेली रक्कम भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळामध्ये जमा केली नसल्याबाबत

**(६) * २०६ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, श्री.श्रीकांत भारतीय, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एसटी कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधी आणि सेवानिवृत्तीचे उपदान हे दोन स्वतंत्र विश्वस्त मंडळ असून ८९ हजार अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतनातून कपात केलेली भविष्य निर्वाह निधी आणि उपदानाची रक्कम या विश्वस्त मंडळामध्ये जमा केली जाते, परंतु मागील १० महिन्यांपासून महामंडळाने या दोन्ही विश्वस्त मंडळाकडे अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात केलेली रक्कम भरली नसल्याने भविष्य निर्वाह निधीचे ११०० कोटी आणि उपदानाचे १००० कोटी असे एकूण २१०० कोटी रुपये थकीत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वेतनातून कपात केलेली ११०० कोटी रुपयांची रक्कम भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळामध्ये न भरण्याची कारणे काय आहेत तसेच एसटी कर्मचाऱ्यांना पाल्यांचे शिक्षण, कार्यप्रसंग, आजारपण आदीसाठी भविष्य निर्वाह निधीतून कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात केलेली रक्कम भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळ आणि उपदानामध्ये न भरल्याने रक्कम काढण्यास प्रतीक्षा करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी एसटी महामंडळाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात केलेली रक्कम भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळामध्ये भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१), (२), (३) व (४) सवलतमुल्याच्या प्रतिपुर्तीपोटी मिळण्याऱ्या निधीमधून रा.प कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्यात येते. प्राप्त निधी पुरेसा नसल्याने एसटी कर्मचाऱ्यांचे/अधिकाऱ्यांचे पीएफ आणि ग्रॅज्युएटीची रक्कम, भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळास व उपदान निधी विश्वस्त मंडळास रुपये २२१४.४७ कोटी अदा करणे बाकी आहे.

-----------------

## राज्यातील महावितरण कंपनीकडून कृषी पंपाला सौर जोडणी घेण्याची सक्ती केली जात असल्याबाबत

**(७) * ४४८ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील दीड-दोन वर्षांपासून महावितरण कंपनीमार्फत कृषी पंपाला पारंपारिक पध्दतीने वीज जोडणी न देता सौर जोडणी घेण्याची सक्ती केली जात असल्याची बाब माहे जानेवारी २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अल्पभूधारक, नदीकाठच्या पुराच्या क्षेत्रात सोलर जोडणीस अडचणी येत असून त्याकरीता शेतीची स्थळ पाहणी करून पूर्वीप्रमाणे पारंपारिक वीज जोडणी द्यावी अशी मागणी पंपधारक शेतकऱ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी राज्यात कृषी पंपाला पारंपारिक वीज जोडणी मिळण्याकरीता केलेल्या अर्जांची संख्या मोठ्या प्रमाणात असून सदर वीज जोडणी देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्यात दिनांक २२/०२/२०२४ रोजी पैसे भरुन प्रलंबित असणाऱ्या लघुदाब कृषीपंप ग्राहकांची संख्या जवळपास १,१२,००० इतकी होती. दिनांक २२/०२/२०२४ रोजी ज्या प्रलंबित ग्राहकांचे आवश्यक पायाभूत सुविधाचे काम प्रगतीपथावर आहे अशा ग्राहकांना पारंपारिक पध्दतीने वीज जोडणी देणे व उर्वरित ग्राहकांना सोलर पंपाद्वारे वीज जोडणी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार यापुढील शेतीच्या नवीन वीज जोडण्या सोलर पंपाच्या माध्यमातून देण्याचा निर्णय झालेला आहे.

शेतकऱ्यांकडून अशी मागणी होत असली तरी शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणीचे निराकरण करुन सौरपंप देण्याबाबत पुढील कार्यवाही महावितरण कंपनीमार्फत सुरु केली आहे. पर्यावरणाचे रक्षण करणे, हरित उर्जेला प्रोत्साहन देणे असे उद्दिष्ट ठेवून राज्यातील कृषीपंप वीज जोडण्याचे सौर उर्जेव्दारे विद्युतीकरण करण्याचे धोरण महावितरण कंपनीने स्विकारले आहे.

(३) पैसे भरुन प्रलंबित असणाऱ्या कृषीपंप ग्राहकांना सोलर पंपाव्दारे वीज जोडणीसाठी उर्वरित पैसे भरुन "मागेल त्याला सौरकृषी पंप" योजनेअंतर्गत अर्ज करण्यास विनंती करण्यात आली. तसेच प्रत्यक्ष भेटी व लघु संदेशाव्दारे योजनेची माहिती देऊन सदर योजनेव्दारे ९० टक्के ते ९५ टक्के अनुदान देऊन सोलार पंप देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याबाबत

**(८) * १९२ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: बीड जिल्ह्यात गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ झाली असून सन २०२० ते २०२४ या कालावधीत बीड जिल्ह्यात २७५ खुनांच्या घटना निदर्शनास आल्या आहेत तसेच माहे जानेवारी, २०२४ ते माहे ऑक्टोबर, २०२४ या दहा महिन्यांच्या कालावधीमध्ये ३६ खुनांच्या, १५६ बलात्काराच्या आणि ४९८ दंगली घडविण्याच्या गुन्ह्यांची नोंद झाल्याची बाब दिनांक ९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बीड जिल्ह्यातील वाढत्या गुन्ह्यांवर प्रतिबंध घालण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

बीड जिल्ह्यातील वाढत्या गुन्ह्यांवर प्रतिबंध घालण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे प्रतिबंधात्मक कारवाया केल्या जात आहेत:-१. भा.न्या.सं. २०२३ कलम १०७ अन्वये एकूण ९३२

२. भा.न्या.सं. २०२३ कलम १०९ अन्वये एकूण २४

३. भा.न्या.सं. २०२३ कलम ११० अन्वये एकूण २७

४. भा.न्या.सं. २०२३ कलम ५६ अन्वये एकूण ०१

५. भा.न्या.सं. २०२३ कलम १२२ अन्वये एकूण ०१

६. भा.न्या.सं. २०२३ कलम १२४ अन्वये एकूण ०१

७. भा.न्या.सं. २०२३ कलम ९३ अन्वये एकूण १२

तसेच अवैध धंद्यांवर प्रतिबंध घालण्याकरीता जुगार प्रकरणी एकूण ६९ तर दारुबंदी प्रकरणी एकूण ३०० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दिव्यांग मंत्रालयाचे स्वतंत्र कामकाज सुरु करण्याबाबत

**(९) * ९८२ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रात देशातला पहिला दिव्यांग कल्याण हा नवीन मंत्रालयीन प्रशासकीय विभाग सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १५ डिसेंबर, २०२४ रोजीच्या अधिसूचनेन्वये स्थापन करण्यात आला असून अद्यापपर्यंत दिव्यांगांच्या सर्वांगीण विकासासाठी मंत्रालयाचे काम सुरू झाले नसल्याचे तसेच या विभागासाठी स्वतंत्र मंत्री, सचिव तसेच जिल्ह्याच्या ठिकाणी स्वतंत्र कार्यालय नसल्याचे व पदनिर्मिती करण्यात आली नसल्याचेही माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इतर राज्यांपेक्षा महाराष्ट्रात दिव्यांगांना कमी मानधन मिळत असून जिल्हा वार्षिक योजनेसह विविध योजनांमध्ये दिव्यांगांसाठी ५ टक्के निधी राखीव ठेवण्यात येत असून निधीअभावी जिल्हा परिषदांनी दिव्यांग कल्याणाच्या योजना बंद केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिव्यांग मंत्रालयाचा स्वतंत्र कारभार व दिव्यांग कल्याणासाठी भरीव आर्थिक तरतुदींसह बंद केलेल्या योजना पुन्हा सुरु करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

दिनांक ५/०४/२०२३ पासून दिव्यांग कल्याण विभाग स्वतंत्ररीत्या सुरु करण्यात आला आहे. शासन निर्णय, दिनांक ४/०१/२०२३ अन्वये मंत्रालयीन प्रशासकीय विभागासाठी ४२ पदे तसेच दिनांक १०/१०/२०२४ च्या शासन निर्णयान्वये मंत्रालयीन विभाग व क्षेत्रिय कार्यालयासाठी २०२१ अशी एकूण २०६३ पदे निर्माण करण्यात आली आहेत.

दिव्यांग कल्याण विभागाच्या स्थापनेपासून मा.मुख्यमंत्री हे विभागाचे मा.मंत्री आहेत. सध्या अपर मुख्य सचिव हे विभागाचे प्रशासकीय प्रमुख म्हणून कार्यरत आहेत.

विभागाचे कामकाज जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचेमार्फत चालविण्यात येत आहे. जिल्हा कार्यालये नियमितपणे सुरु करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

दिव्यांगासाठीच्या कल्याणकारी योजना जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येतात.

पंचायत राज संस्थांनी त्यांच्या स्वउत्पन्नातून ५% निधी दिव्यांगासाठी वैयक्तिक व सामुहिक स्वरुपाच्या योजनासाठी आरक्षित ठेवण्यात येतो. निधीच्या खर्चाबाबत शासन निर्णय, ग्रामविकास विभाग, दिनांक २५/०६/२०१८ नुसार मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थाना त्यांच्या स्तरावर विविध योजना राबविण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

(३) विभागामार्फत दिव्यांगासाठी राबविण्यात येत असलेल्या योजनांमधील अनुदानाच्या रकमेत वाढ करण्याचे प्रस्तावित असून कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील विद्यमान विधानसभा सदस्यांच्या हत्येचा कट रचण्यात आल्याबाबत

**(१०) * ६४६ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील विद्यमान विधानसभा सदस्य यांच्या हत्येचा कट रचण्यात आल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे. अर्जदार मोहम्मद रफिक मोहम्मद शरिफ खान रा. अंबरनाथ यांच्या दिनांक २३/१२/२०२४ रोजीच्या तक्रार अर्जानुसार श्री.बालाजी किणीकर, विसस. (अंबरनाथ) यांना जीवे ठार मारण्याचा कट रचला असल्याचे कळविले आहे. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने चौकशी चालू आहे.

(२) प्रस्तुत तक्रार अर्जाची चौकशी खंडणीविरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर करीत आहेत. सदर अर्जाच्या संबंधाने गुप्त बातमीदार तसेच तांत्रिक मुद्दयावर अधिक चौकशी चालू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील वरळी पोलीस कॅम्प इमारतीतील नुतनीकरण व दुरुस्तीच्या कामांमध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(११)** * **८२८ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वरळी येथील पोलीस कॅम्प इमारतीमध्ये नूतनीकरण व दुरुस्तीची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याने रहिवाशांच्या जिवीतास धोका निर्माण झाला असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नूतनीकरण व दुरुस्तीच्या निकृष्ट दर्जाच्या कामांमुळे उक्त कॅम्पमधील इमारत क्रमांक १६, खोली क्रमांक ११ मध्ये नुतनीकरण केलेल्या खिडकीची ग्रॅनाईट पडून दुखापत झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त वसाहतीच्या नूतनीकरण व दुरुस्तीच्या कामांमध्ये जुन्या कामांना नवीन दाखवून कंत्राटदार व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तत्कालीन कार्यकारी अभियंता, उप अभियंता व इतर अधिकारी/कर्मचारी यांनी संगनमताने शासनाच्या निधीमध्ये गैरव्यवहार केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक रहिवाशांनी व सामाजिक संघटनांनी तक्रारी करुनही शासनाकडून कंत्राटदार व संबंधित अधिकारी यांचे आर्थिक हितसंबंध असल्यामुळे कारवाई करण्यास जाणीवपुर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने दोषी कंत्राटदारास काळ्या यादीत टाकून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही, सदर बाबत संबंधित रहिवाशांकडून कोणतेही अर्ज/निवेदन प्राप्त झालेले नाही.
(२), (३), (४) व (५) सदर घटनेबाबत कोणत्याही प्रकारची माहिती अथवा तक्रार अर्ज प्राप्त झालेले नाहीत. परंतु प्रस्तूत प्रकरणी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सशस्त्र पोलीस वरळी, मुंबई यांच्याकडून अधिकची माहिती घेतली असता, दिनांक २९/०६/२०२४ रोजी इमारत क्र. १६ सदनिका क्र.११ मध्ये राहवयास असलेल्या श्रीमती माधुरी अनिल लोहार यांना डोक्यात ग्रेनाईट पडुन त्या महिलेस जखम झाली होती. सदर बाबत नमुद सदनिकेमध्ये राहणारे पोलीस शिपाई व त्यांचे कुटुंबियांनी कोणत्याही प्रकारचा तक्रार अर्ज दिलेला नाही किंवा कोणत्याही माध्यमाद्वारे कळविलेले नाही.सदर घटनेच्या अनुषंगाने, सार्वजनिक बांधकाम विभागास सदर प्रकरणी शहानिशा करणेबाबत तसेच भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडू नये याबाबत दक्षता घेण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रत्नागिरीच्या समुद्रात गस्ती नौकेतील अधिकाऱ्यांवर हल्ला करण्यात आल्याबाबत

**(१२) * ५१० श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरीच्या समुद्रात दिनांक ८ जानेवारी, २०२५ रोजी अवैध बोटी असल्याची माहिती मिळाल्याने रत्नागिरी जिल्ह्याची गस्ती नौका गोळप-पावस दिशेने गेली असता रात्री साडेअकराच्या सुमारास परप्रांतीयांच्या ३५ ते ४० हायस्पीड बोटींनी अधिकाऱ्यांच्या गस्ती नौकेला घेरुन या बोटींवरील खलाशांनी अधिकाऱ्यांवर हल्ला केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी परप्रांतीयांच्या ३५ ते ४० हायस्पीड बोटींनी अधिकाऱ्यांच्या गस्ती नौकेला घेरुन त्यांचेवर हल्ला केल्याप्रकरणी तसेच त्यांना अटक करुन त्यांच्यावर कारवाई करून समुद्रातील सुरक्षा व्यवस्था बळकट करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी एका बोटीतील ७ खलाशी यांच्याविरुध्द रत्नागिरी पूर्णगड पोलीस ठाणे गु.र.नं.०७/२०२५, बीएनएस कलम १३२,१८९ (२), १९०,११५ (२), ३५१ (२) अन्वये दिनांक १०/०१/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला असून दिनांक २८/०२/२०२५ रोजी सदर प्रकरणी मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

अशा प्रकारच्या घटनांवर आळा घालण्यासाठी खालील सुरक्षाविषय उपाययोजना केल्या आहेत.

(अ) पोलीस, मत्स्यविभाग, कोस्टगार्ड यांचे वतीने संयुक्त गस्त घालण्यात येते.

(ब) अशा प्रकारच्या घटना घडु नयेत म्हणून गोपनीय यंत्रणा सतर्क करण्यात आली असून सदरबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(क) सुरक्षिततेच्या दृष्टीने समुद्री भागावर निगराणी ठेवण्यासाठी ड्रोनचा वापर व इतर उपाययोजना करण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील वीज दरवाढ कमी करण्याबाबत

**(१३) * १३० श्री.सचिन अहिर, श्री.सुनिल शिंदे, श्री.मिलिंद नार्वेकर, ॲड.अनिल परब, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरामध्ये बेस्ट तसेच उपनगरामध्ये टाटा पॉवर, अदाणी व राज्यभरात महावितरणकडून करण्यात येणाऱ्या वीज पुरवठ्याच्या दरवाढीचा प्रस्ताव महाराष्ट्र वीज नियामक आयोगाला माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील घरगुती, छोटे व्यावसायिक आणि औद्योगिक घटक या वर्गवारीतील वीज ग्राहकांना आकारण्यात येणारा वीज दर अन्य राज्यांच्या तुलनेने जास्त असल्याचे दिनांक ९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वीज दरवाढीमुळे वीज ग्राहकांमध्ये नाराजी पसरली असून, वीजदराचा परिणाम ग्राहकांवर व औद्योगिक विकासावर होत असल्याने याबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, राज्यातील वीज ग्राहकांकरीता वीजदर स्वस्त आणि रास्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने(MERC) जारी केलेल्या बहुवर्षीय वीजदर विनियम, २०१९ व २०२४ अनुसार बेस्ट, टाटा पॉवर, अदाणी व महावितरण या वीज वितरण कंपन्यांमार्फत बहुवर्षीय वीजदर याचिका मा.महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे (MERC) सादर करण्यात आल्या आहेत.
(२) हे खरे नाही.

मा.महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे (MERC) सादर केलेल्या याचिकेमध्ये प्रथमच टप्प्या-टप्प्याने वीजदर कपातीबाबत महावितरणने बहुवर्षीय वीजदर याचिका मा.महाराष्ट्र वीज आयोगास सादर केली आहे. तसेच अदाणी इलेक्ट्रिसिटी, बेस्ट प्रशासन व टाटा पॉवर यांनीसुद्धा वीजदरात कपात प्रस्तावित केली आहे.

राज्यातील ग्राहकांना लागू असलेल्या वीजदरांची इतर राज्यातील वीजदरांशी तुलना करताना राज्यांमधील उपलब्ध वीजनिर्मिती स्त्रोतांमधील भिन्नता, त्या अनुषंगाने बदलणारी वीज खरेदी किंमत, ग्राहक वर्गवारी व ग्राहकांच्या वीज वापरांमधील वैविध्य, तुलनेने मोठे भौगोलिक क्षेत्र, इ. बाबींमुळे तफावत दिसून येते. तसेच प्रत्येक राज्यातील नैसर्गिक साधन संपत्तीमध्ये मोठ्या प्रमाणात तफावत आहे.
(३) औद्योगिक वर्गवारीतील ग्राहकांचे वीजदर सरासरी वीजदर पुरवठादराइतकेच (ACOS) ठेवल्याने औद्योगिक ग्राहकांना कृषी वर्गवारी साठी क्रॉस सबसिडी देण्याची गरज पडणार नाही. यामुळे लघु / मध्यम उद्योजकांनाही मोठा दिलासा मिळेल.

औद्योगिक वर्गवारीतील ग्राहकांना मा.वीज नियामक आयोगाद्वारे लागू केलेली सर्व प्रोत्साहने व सवलती कायम ठेवण्यात आलेली आहेत.
(४) विद्युत अधिनियम २००३ मधील तरतुदींनुसार महाराष्ट्र वीज नियामक आयोगास राज्यातील वितरण परवानाधारकांच्या ग्राहकांचे वीजदर निश्चित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. एकूण महसूलाची गरज व त्याप्रमाणात वीजदर ठरवून मिळावेत या करीता महाराष्ट्र वीज नियामक आयोग यांच्याकडे वीज वितरण कंपनीतर्फे वीजदर सुधारणा प्रस्ताव सादर करण्यात येतो. संपूर्ण नियामक प्रक्रियेचा अवलंब करुन मा.महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या बहुवार्षिक वीजदर याचिका आदेशानुसार (MYT Tariff Order) राज्यात वीजदर निश्चित केले जातात.

सदर वीजदर निश्चितीचे अधिकार मा.महाराष्ट्र वीज नियामक आयोगास (MERC) आहेत. त्यानुसार सर्व नियामक प्रक्रियेचा अवलंब करुन मा.महाराष्ट्र वीज आयोगाद्वारे आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३० या कालावधीसाठी वीजदर आदेश जारी करण्यात येतील. त्यानुसारच वीज वितरण कंपन्यांकडून वीज दराची आकारणी करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महावितरण कंपनीच्या कल्याण आणि भांडूप परिमंडळामध्ये कोटयवधी रूपयांची वीज चोरीची प्रकरणे उघडकीस आल्याबाबत

**(१४) * १०३४ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण आणि भांडूप परिमंडळामध्ये महावितरण कंपनीने मागील वर्षी माहे एप्रिल ते डिसेंबर, २०२४ या कालावधीमध्ये घरगुती, वाणिज्यिक तसेच औद्योगिक वीज वापरकर्त्या लोकांचे वीज मीटर तपासणीची कार्यवाही करत असताना केलेल्या कार्यवाहीमध्ये हजारोंच्या संख्येने वीज वापरकर्त्या लोकांव्दारे वीजेची चोरी होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महावितरण कंपनीने कल्याण आणि भांडूप परिमंडळामध्ये वीज मीटर तपासणीच्या कार्यवाही नुसार वीज चोरी केलेल्या संबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्याबाबत तसेच झालेल्या नुकसानीची वसुली करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय,हे खरे आहे.

महावितरण कंपनीमार्फत माहे एप्रिल ते डिसेंबर, २०२४ या कालावधीत घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक वीज वापरकर्त्या लोकांच्या वीज मीटरची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये कल्याण व भांडूप परिमंडळामध्ये अनुक्रमे ७२४८ व २९६० वीज चोरी उघडकीस आणण्यात आल्या आहेत.
(२) महावितरण कंपनीच्या कल्याण व भांडूप परिमंडळामध्ये घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक वीज वापरकर्त्याकडे, माहे एप्रिल ते डिसेंबर, २०२४ या दरम्यान राबविण्यात आलेल्या तपासणी मोहिमेतंर्गत उघडकीस आलेल्या वीज चोरी प्रकरणात निर्धारित करण्यात आलेली रक्कम अनुक्रमे रुपये ४३.०२ कोटी व रुपये २०.३३ कोटी आहे. सदर रकमेपैकी अनुक्रमे रुपये १७.८५ कोटी व रुपये १६.२२ कोटी रुपये वसूल करण्यात आले आहे. तसेच कल्याण व भांडूप परिमंडळामध्ये अनुक्रमे १३५१ व ३२४ वीज चोरी प्रकरणांमध्ये संबंधित पोलीस स्टेशन मध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चाकण (जि.पुणे) बिरदवडी औद्योगिक वसाहतीतील कंपनीच्या रसायनमिश्रित सांडपाण्यामुळे रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत

**(१५) * ११४७ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाकण (जि.पुणे) बिरदवडी औद्योगिक वसाहती मधील मदरसन ऑटोमेटिव्ह टेक्नॉलॉजी ॲण्ड इंजिनिअरींग प्रा.लि. या कंपनीने रसायनमिश्रीत सांडपाणी मोकळया जागेत सोडल्यामुळे बिरदवडीकरांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आजुबाजुच्या गावातील लोकांना भाम चाकण या ठिकाणी जातेवेळी मोठ्या प्रमाणावर दुर्गंधीचा त्रास होत असून त्यांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनीमुळे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होत असल्याने तेथील रहिवाशांना कॅन्सर सारखे दुर्धर आजार व इतर श्वसनासंबंधीचे विकार होण्याची शक्यता असून कंपनी कुठल्याही कायद्याची अथवा शासनाने घालून दिलेल्या निर्बंधांचे तसेच नियमांचे पालन करीत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी ग्रामस्थांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, तहसिलदार कार्यालय खेड, गटविकास अधिकारी, खेड व ग्रामपंचायत बिरदवडी यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, नागरिकांचे आरोग्य धोक्यात आणणाऱ्या सदर कंपनी विरोधात शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार प्रश्नाधीन विषयाच्या अनुषंगाने कोणतीही तक्रार त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही.
(४) हे खरे आहे.
(५) • प्रश्नाधीन उद्योगामधून होणाऱ्या प्रदूषणाबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दिनांक १३ जानेवारी, २०२५ रोजी पाहणी करण्यात आली होती.
• सदर पाहणीदरम्यान उद्योगाने प्रक्रियाकृत औद्योगिक सांडपाणी प्रक्रियेमध्ये पुनश्च वापर करण्याकरताची संनियंत्रण यंत्रणा न बसविता प्रक्रियाकृत पाण्याचा वापर स्वत:च्या बाग बगिचाकरीता केल्याचे आढळून आले होते.
• सदर पाहणीदरम्यान प्रश्नाधीन उद्योगास दिलेल्या संमतीपत्रातील अटींचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत उक्त उद्योगास दिनांक २१ फेब्रुवारी, २०२५ रोजी प्रस्तावित निर्देश बजावले आहेत. तसेच दिनांक २८ फेब्रुवारी, २०२५ रोजी सदर उद्योगाची वैयक्तिक सुनावणी घेऊन रुपये २.५ लक्ष ची बँक हमी जप्त करण्यात आलेली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील धनगर समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मिळणाऱ्या अनुदानामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१६) * १२४९ श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील धनगर समाजाचे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळण्यासाठी शहरातील नामांकित इंग्रजी शाळेमध्ये इयत्ता १ ली ते इयत्ता १२ वी पर्यंत शिक्षण देण्याची योजना कार्यान्वित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धनगर समाजातील विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या अनुदानाची नस्ती जिल्हास्तरावरून विभागीय स्तरावर मंत्रालयात जाते, सदर अनुदानाची नस्ती पुढे पाठविण्यासाठी सांगली जिल्ह्याच्या समाज कल्याण कार्यालयातून पैशाची मागणी झाली असल्याची बाब माहे जून, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समाज कल्याण विभागाच्या तत्कालीन अतिरिक्त सहायक संचालक महिला अधिकाऱ्यांनी गैरव्यवहार केल्याप्रकरणी त्यांना निलंबित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी करून गैरव्यवहाराची रोखण्यासाठी आणि सदर धनगर समाजातील विद्यार्थ्यांना अनुदान देण्याची प्रक्रिया ऑनलाईन करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या दिनांक ४/९/२०१९ च्या शासन निर्णयास अनुसरुन, धनगर समाजातील विद्यार्थ्यांना शहरांतील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये इयत्ता १ ली ते इयत्ता १२ वी पर्यंत शिक्षण देण्याची योजना राबविण्यात येत आहे.

(२) व (३) इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या दिनांक ३०/८/२०२३ च्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे सदर योजनेंतर्गत मान्यता देण्यात आलेल्या शाळांना शुल्क वितरणाची कार्यवाही करण्यात येते.

सदर योजनेंतर्गत निवड करण्यात आलेल्या शाळेला शुल्काची रक्कम वितरीत करण्याप्रकरणी तत्कालिन सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, सांगली (अतिरिक्त कार्यभार) यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमांतर्गत कारवाई होऊन त्यांचेविरुध्द दिनांक ६/६/२०२४ रोजी सांगली शहर पोलीस ठाणे अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना निलंबित करण्यात आले आहे.

(४) व (५) आदिवासी विकास विभागाच्या ‘नामांकित शाळा पोर्टल’ धर्तीवर धनगर समाजातील विद्यार्थ्यांसाठी सुरु असलेल्या नामांकित शाळा योजनेसाठी स्वतंत्र ऑनलाईन प्रणाली सुरु करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## वसई गाव (जि.पालघर) येथील बस स्थानकाची दुरवस्था झाल्याबाबत

**(१७) * १३३९ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई गाव (जि.पालघर) येथील बस स्थानकाची दुरवस्था झालेली असल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत असून सदर बस स्थानक कोसळण्याच्या स्थितीत असताना ते दुरुस्त न करता केवळ परिसरातील रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यात येत असल्याने प्रवाशांच्या जिवीतास धोका निर्माण झाला असल्याची बाब माहे जानेवारी २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई गाव येथील दुरवस्था झालेल्या बस स्थानकांचे नुतनीकरण करण्यासाठी बस आगाराचे नुतनीकरण करणे, आवश्यक सोयी-सुविधा व निधी उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :**

(१), (२) व (३) रा.प वसई येथील बसस्थानकाचे विशेष दुरुस्तीचे काम प्रगती प्रथावर आहे. तसेच एम.आय.डी.सी सोबत झालेल्या सामंजस्य कराराच्या अनुषंगाने वसई बसस्थानकाच्या वाहनतळ काँक्रीटकरणाचे काम प्रगती प्रथावर आहे.

-----------------

## रेट्याखेडा (ता.अमरावती) येथील ७७ वर्षीय महिलेला जादूटोण्याच्या संशयावरून मारहाण केल्याबाबत

**(१८) * १३८३ श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेट्याखेडा (ता.अमरावती) येथील काळमी सेलूकर या ७७ वर्षीय आदिवासी वृध्द महिलेला जादू टोण्याच्या संशयावरुन गावातील सायबू चतुर व त्याची पत्नी तसेच पोलीस पाटील यांनी दिनांक ३० डिसेंबर, २०२४ रोजी गरम साखळीचे चटके देऊन, अमानुष कृत्य करीत तोंडाला काळे फासून धिंड काढली असल्याची बाब दिनांक १७ जानेवारी २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी असे अघोरी प्रकार घडल्यानंतर अद्याप अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करुन संबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर घटनेची चौकशी करुन संबंधित दोषींवर गुन्हा दाखल करुन कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे,

(२) व (३) सदर प्रकरणी चिखलदरा पोलीस स्टेशन येथे भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ११८(२), १९१(२), १२७(२), ३५२, ३५१ (२)(३), २३८, ३(५) सह महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा व जादुटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्याचे समुळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम २०१३ कलम ३(२) अन्वये अप.क्र.०४/२०२५, दिनांक ०७/०१/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्यात एकूण पाच आरोपी अटक असून, मा.न्यायालयात आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सध्या आरोपी जामीनावर आहेत.

सदर गुन्ह्यातील चार आरोपींवर बी.एन.एस. कलम १२६, १३५(३) व एका महिला आरोपीवर १२५, १३५(३) अन्वये प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी पोलीस पाटील यांना बडतर्फ करण्यात आले आहे. तसेच सदर गुन्ह्यासंदर्भात हलगर्जीपणा व कसुरी केल्याबाबत एक पोलीस निरीक्षक, तीन कर्मचारी यांना निलंबित करण्यात आले असून, दोन पोलीस कर्मचाऱ्यांची मुख्यालयात बदली करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण (महाज्योती) संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना मिळत असलेल्या आर्थिक सहाय्यामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१९) * १४४९ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण (महाज्योती) संस्थेमार्फत स्पर्धा परीक्षांचे कोचिंग आणि फेलोशिप योजना राबविण्यात येत असून संस्थेमार्फत पुणे, अमरावती, नागपूर, छत्रपती संभाजीनगर व नाशिक या पाच जिल्ह्यात उत्कृष्टता केंद्र स्थापन करण्यात येईल असे निर्देश मा.मुख्यमंत्र्यांनी दिले असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमृत (महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी) संस्था व महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) या संस्थांच्या माध्यमातून शासनाने समाजातील खुल्या वर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील तसेच इतर मागास वर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना न्याय देण्याच्या उद्देशाने स्पर्धा परीक्षा देणाऱ्या युवक युवतींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कल्याणकारी योजना सुरू केल्या आहेत, त्याकरीता खुल्या वर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना व इतर मागास वर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य (स्टायपेंड) देण्यासाठी विशिष्ट क्लासेसची निवड करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर संस्थेतील वरिष्ठ अधिकारी यांच्या संगनमताने क्लास चालक व सदर संस्थेद्वारे राबविण्यात येणाऱ्या निविदा प्रक्रियेतील टेंडर मिळवून त्यामध्ये गैरव्यवहार करीत असल्याचे त्यामुळे सदर प्रक्रियेमध्ये शासनाचे जवळपास २०० कोटींपेक्षा जास्त रक्कम अधिकारी/क्लास चालक व विद्यार्थी यांच्या संगनमताने वाटली जात असल्यामुळे खरे लाभार्थी या योजनेपासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात विद्यार्थ्यांनी तक्रार केली असता त्यांच्यावर दबाव टाकण्यात येवून धमकविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे तसेच उक्त गैरप्रकार टाळण्यासाठी व सदर प्रक्रियेला स्थगिती देऊन संबंधित विद्यार्थ्यांना त्यांच्या इच्छेनुसार क्लास निवडणेबाबत व सदर प्रकरणात गैरप्रकार करणाऱ्या संबंधित संस्थेच्या अधिकारी/क्लास चालक व विद्यार्थी यांच्याविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) हे खरे नाही.

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर यांच्यामार्फत ई-निविदा प्रक्रिया राबवूनच प्रशिक्षण संस्थांची निवड करण्यात आलेली आहे.

तसेच, विद्यार्थ्यांची निवड ही चाळणी परीक्षा घेऊन गुणवत्तेनुसार करण्यात आली आहे. चाळणी परीक्षेबाबतची सविस्तर माहिती महाज्योती संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत असल्याने सदर निवड प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक पध्दतीने राबविण्यात आली आहे. तसेच, प्रशिक्षणासाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना नियमित विद्यावेतन अदा करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आखाडा बाळापूर (जि.हिंगोली) येथील शेतकरी प्रशिक्षण केंद्रातील कृषी सहायक यांची हत्या केल्याबाबत

**(२०) * १४९६ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आखाडा बाळापूर (जि.हिंगोली) येथील शेतकरी प्रशिक्षण केंद्रातील कृषी सहायक यांना त्यांच्या कार्यालयात घुसून तेथील कामगाराने त्यांची निघृण हत्या केली असल्याची बाब माहे डिसेंबर २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घटनेला नऊ महिने होवूनही पोलिसांकडून सदर आरोपीला अटक करुन त्याचेविरुध्द कोणतीही कारवाई केली नसल्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष व तीव्र संताप निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणातील आरोपींना अटक करुन त्याच्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) सदर प्रकरणातील फिर्यादीवरून मयत कृषी सहायक, शेतकरी प्रशिक्षण केंद्र, बाळापूर यांचा खून केल्यासंबंधी पोलीस स्टेशन बाळापूर येथे गु.रजि.नंबर १५५/२०२४ कलम ३०२, १२०(ब), २१२, १७७ भादंवि प्रमाणे दोन आरोपींविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

सदर गुन्ह्यातील एका आरोपीस दिनांक १६/०३/२०२४ रोजी अटक करून त्यास पोलीस कस्टडी रिमांड मध्ये घेतले आहे. दुसरा आरोपी हा गुन्हा घडला तेव्हापासून फरार असून त्यास अटक करण्याकरीता त्याचे मोबाईलचे सि.डी. आर., त्याचे बँके स्टेटमेंट ताब्यात घेतले आहेत. फरार आरोपीचा शोध सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जांभळी नाका (जि.ठाणे) येथील एका शैक्षणिक संस्थेने विद्यार्थ्यांची आर्थिक फसवणूक केल्याबाबत

**(२१)** * **१५२५ श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जांभळी नाका (ठाणे) येथील एका शैक्षणिक संस्थेकडून सन २०१३ पासून अकरावी–बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी अभियांत्रिकीच्या पुर्वतयारीची (आयआयटी आणि जेईई) शिकवणी घेऊन अकरावी आणि बारावी असे दोन वर्षांसाठी रुपये सहा लाख शुल्क आकारले जात होते, या शैक्षणिक संस्थेमध्ये माहे एप्रिल, २०२४ मध्ये २०० हून अधिक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता, परंतु अचानक शिकवणी बंद केल्याने विद्यार्थ्यांची ३ कोटी रुपयांची आर्थिक व शैक्षणिक फसवणूक केल्याप्रकरणी सर्व पालकांनी या शैक्षणिक संस्थेविरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांची आर्थिक व शैक्षणिक फसवणूक करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) आणि (२) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी ठाणेनगर पोलीस ठाणे, ठाणे शहर येथे दिनांक ०६/०१/२०२५ रोजी गु. र. क्र.११/२०२५ भारतीय न्यायसंहिता, २०२३ मधील कलम ३१८(४), ३१६(२), ३५१(२), ३(५) अन्वये ०८ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी फी आकारणीकारिता वापरत असलेल्या ॲक्सिस बँकेच्या विविध बँक खात्यांची माहिती मिळण्यासाठी व गोठविण्यासाठी संबंधित बँकांशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. सदर प्रकरणी अधिक तपास पोलीसांमार्फत करण्यात येत आहे

(३) प्रश्न उद्धभवत नाही.

-----------------

## सातारा येथील मुख्य पोस्ट कार्यालयात विविध योजनेतील गुंतवणूकदारांची फसवणूक झाल्याबाबत

**(२२) * ९७४ श्री.शशिकांत शिंदे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा मुख्य पोस्ट ऑफीस कार्यालयातील एसआयएस ज्येष्ठ नागरीक योजना, किसान विकास पत्र, आर.डी. अकाऊंट तसेच इतर योजनेत नागरिकांनी कोट्यवधी रुपये गुंतविले असून, या योजनेत गुंतविलेले लाखो रुपये तेथील कर्मचारी व एजटांनी गुंतवणुकदारांना अनभिज्ञ ठेवून काढून घेतल्याची बाब दिनांक २० मार्च, २०२४ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात गुंतवणुकदारांनी जिल्हाधिकारी, सातारा, जिल्हा पोलीस अधीक्षक व जनरल पोस्ट प्रधान कार्यालय, पुणे यांचेकडे तक्रारी दाखल केली असून गरीब व कष्टकरी नागरिकांचे लाखो रुपये परत केले नसल्यामुळे गुंतवणुकदारांनी सामुहिक आत्मदहन करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सातारा येथील गुंतवणुकदारांचे हक्काचे पैसे परत मिळण्याकरीता तसेच सदर एसआयएस योजनेमध्ये गुतंवणूक केलेल्या रकमेत गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकारी व एंजट यांच्याविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी गुंतवणुकदारांनी सातारा मुख्य पोस्ट ऑफिस कार्यालय येथे दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजी पोस्ट ऑफिस समोर आत्मदहन करणार असल्याबाबतचा निर्णय घेणार असल्याचे निवेदन वरीष्ठ अधीक्षक, पोस्ट ऑफिस, सातारा यांना दिले होते.

(३) सदर प्रकरणी पोस्ट ऑफिस सातारा येथे अधिकारी व गुंतवणुकदार यांच्यात दिनांक २४ जानेवारी, २०२५ रोजी झालेल्या चर्चेअंती गुंतवणूकदारांचे पैसे लवकरात लवकरात देण्याचे आश्वासन दिल्याने व दिल्ली येथे MPKBY एजंट आणि संबंधित अधिकारी यांचेवर CBI, नवी दिल्ली येथे तक्रार क्र. RC/०५९/२०२४/A०००२ अन्वये गुन्हा दाखल केला असल्याने तसेच संबधितावर विभागीय चौकशी चालू असल्याचे सांगितल्याने गुंतवणुकदारांनी आत्मदहनाचा निर्णय रद्द केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे भरणेबाबत

**(२३) * १५४६ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील पशुवैद्यकीय अधिकारी, सहाय्यक अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक, संगणक तंत्रज्ञ, इत्यादी पदे रिक्त असल्यामुळे जळगाव जिल्ह्यातील पशुधनाच्या आरोग्य सुविधेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असल्याची बाब दिनांक २५ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे खरे नाही.

शासन निर्णय दिनांक १०/१०/२०२४ अन्वये पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाची पुनर्रचना व आकृतिबंध मंजूर करण्यात आला असून, यानुसार रिक्त पदे भरणेबाबत शासनस्तरावरून महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) विलंब नाही.

-----------------

## देवलापार (ता.रामटेक, जि.नागपूर) येथील ताज राईस मिल या औद्योगिक ग्राहकाने वीज चोरी केल्याबाबत

**(२४) * २२९ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवलापार (ता.रामटेक, जि.नागपूर) येथील ताज राईसिमल या औद्योगिक ग्राहकाने अवैधरित्या वीज पुरवठा घेत मागील १२ महिन्यांत ४ लाख ९० हजार ३२ युनिटचा अवैध वापर करून १ कोटी २ लाख २३ हजार ८९४ रुपयांची वीज चोरी केल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त अवैधरित्या वीजेचा वापर करून केलेल्या वीज चोरीच्या तडजोडीकरीता १३ लाख १० हजाराचा दंड देखील आकारण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, देवलापार (ता.रामटेक, जि.नागपूर) येथील ताज राईसिमल या औद्योगिक ग्राहकाने अवैधरित्या वीज चोरी केल्याप्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) देवलापार येथील ताज राईस मिल या औद्योगिक ग्राहकाने अवैधरित्या वीज चोरी केल्या प्रकरणी सुरक्षा व अंमलबजावणी, नागपूर परिक्षेत्रांतर्गत असलेल्या नागपूर शहर भरारी पथकाने रामटेक पोलीस स्टेशन, नागपूर येथे विद्युत अधिनियम २००३ (सुधारित २००७) च्या कलम १३५ अन्वये वीज चोरीचा गुन्हा (गुन्हा

क्र. ००१७, दिनांक ०९/०१/२०२५) नोंदविला आहे. तसेच सदर ग्राहकाचा वीज पुरवठा खंडीत करुन रामटेक उप विभागातील देवलापार वितरण केद्राचे शाखा अभियंता यांना निलंबित करुन या प्रकरणी विभागीय चौकशी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत रिक्त पदे भरणेबाबत

**(२५) * ४५८ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या ४२ विभागांमध्ये सद्य:स्थितीत अडीच लाखाहून अधिक पदे रिक्त असून शासनाने दरवर्षी ५० हजार पदांची मेगा भरती करण्याकरीता काही जाहिराती प्रसिध्द केल्या असल्या तरी सदर भरती प्रक्रिया राबवण्यासाठी लोकसेवा आयोगाकडे मनुष्यबळ नसल्याने लोकसेवा आयोगाला उपरोक्त रिक्त पदे भरण्यासाठी व भरती प्रक्रिया सुलभ होण्यासाठी आहे त्या अधिकारी कर्मचाऱ्यांमध्ये अतिरिक्त १५० ते २०० पदे वाढवून देण्याची मागणी लोकसेवा आयोग कर्मचारी संघटनेने राज्य शासनाकडे केली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मनुष्यबळ नसल्यामुळे खाजगी कंपनीकडून परीक्षांचे नियोजन केले जात असल्याने त्यामध्ये अपारदर्शकता, पेपर फुटी, कॉपी, मार्कांमध्ये तफावत असे अनेक गैरप्रकार वारंवार निदर्शनास येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने रिक्त पदे भरण्यासाठी घोषणा करुनही १५ पेक्षा जास्त विभागात भरती प्रक्रिया राबविण्यात आली नाही तसेच तलाठी व जिल्हा परिषदेची भरती प्रक्रिया राबविल्यानंतर उमेदवार पात्र होऊनही त्यांना नियुक्तीचे पत्र दिले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी राज्यात रिक्त असलेली पदे भरण्यासंदर्भात तसेच तलाठी व जिल्हा परिषदेची भरती प्रक्रिया राबविल्यानंतर उमेदवार पात्र होऊनही त्यांना नियुक्तीचे पत्र देण्यासंदर्भात त्याचप्रमाणे रिक्त पदे भरण्यासाठी व भरती प्रक्रिया सुलभ होण्यासाठी आहे त्या अधिकारी कर्मचाऱ्यामंध्ये अतिरिक्त १५० ते २०० पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगास वाढवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) संघटनेची मागणी शासनास प्राप्त झाली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) हे खरे नाही.

तलाठी तसेच जिल्हा परिषदेतील पदे ही महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरली जात नाहीत. तसेच नियुक्ती पत्र देण्याची कार्यवाही देखिल आयोगामार्फत केली जात नाही. त्यामुळे या विषयाचा आयोगाच्या मनुष्यबळाशी कोणताही संबंध नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईसह राज्यातील मराठी नागरीकांवर परप्रांतीयांकडून होणाऱ्या अन्याय व अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याबाबत

**(२६) * १८२१ श्री.सुनिल शिंदे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यात दिवसेंदिवस मराठी माणसांवर परप्रांतीयांकडून अन्याय व अत्याचार करणारे प्रकार वाढत असून डोंबिवली (मानपाडा) येथील पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नांदिवली परिसरातील एका सोसायटीमधील सत्यनारायण महापूजेच्या दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या हळदीकुंकू कार्यक्रमाला अमराठी कुटुंबीयांनी विरोध केल्याने मराठी विरुध्द अमराठी असा वाद झाल्याचे दिनांक २९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या काही महिन्यांपासून मराठी लोकांच्या खानपान पध्दतीवरून व मराठी भाषेवरुन वाद निर्माण होऊन मराठी कुटूंबियांवर प्राणघातक हल्ला करण्याचे प्रमाण वाढले असल्याने तसेच मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, पनवेल इत्यादी शहरात मराठी विरुध्द परप्रांतीय अशा वादाच्या घटना सातत्याने होत असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी राज्यातील प्रमुख शहरांत मराठी विरुध्द परप्रांतीय नागरिकांच्या वादाच्या घटना रोखण्यासाठी व तसेच संबंधितांवर कारवाई करण्यासाठी ॲट्रॉसिटी कायदा पारित करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय;

(४) सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

सदर प्रकरणी मानपाडा पोलीस स्टेशन, ठाणे शहर गु. र. क्र.१०८/२०२५, भारतीय न्यायसंहिता २०२३ कलम १९६, ३००, ३(५) प्रमाणे दिनांक १९/१२/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(२) अशा स्वरुपाच्या घटना मुंबई, नवी मुंबई तसेच पनवेल येथे घडलेल्या नाहीत.

तथापि, खडकपाडा पोलीस ठाणे, ठाणे शहर येथे दिनांक १९/१२/२०२४ रोजी गु. र. नं. ८८८/२०२४

भारतीय न्यायसंहिता २०२३ कलम ७४, ११५(२), ३५२, ३५१(२), ३(५) व गु. र. नं. ८९०/२०२४ या संदर्भात गुन्हे दाखल आहेत.

तसेच पेण पोलीस ठाणे, रायगड येथे भारतीय न्यायसंहिता २०२३ मधील कलम १६८ प्रमाणे महिलेस नोटीस देण्यात आली आहे व त्यांनतर भारतीय न्यायसंहिता २०२३ मधील कलम १२६ प्रमाणे प्रतिबंधक कार्यवाही केली आहे.

(३) अशी बाब दिसून आली नाही.

(४) रायगड येथे घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने परप्रांतीय महिलेस बी.एन.एस.एस. २०२३ चे कलम १६८ प्रमाणे नोटीस देण्यात आली आहे व त्यांनतर बी.एन.एस.एस. २०२३ चे कलम १२६ प्रमाणे प्रतिबंधक कार्यवाही केली आहे, तसेच मानपाडा व खडकपाडा पोलीस ठाणे येथे नमुद घटनेच्या अनुषंगाने गुन्हा दाखल

करण्यात आला असून त्यातील दोन गुन्हे तपासावर प्रलंबित असून गु.र.नं.८९०/२०२४ गुन्हयांतील आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्याच्या मुख्य माहिती आयुक्त पदासह विभागीय माहिती आयुक्तांची रिक्त पदे भरणेबाबत

**(२७) * ९८६ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहिती आयुक्तांच्या ११ पदांची तरतूद करण्यात आली असून सध्या प्रत्यक्षात ७ विभागीय माहिती आयुक्तांपैकी ३ पदे रिक्त असून मागील २० महिन्यांपासून राज्याचे मुख्य माहिती आयुक्त पद रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात माहिती अधिकाऱ्यांकडील १ लाखांहुन अधिक प्रकरणे प्रलंबित असून रिक्त पदांमुळे संबंधित प्रकरणे निकालात काढण्याकरीता अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुख्य माहिती आयुक्तांची नेमणुक व रिक्त पदे भरण्यासंदर्भात तसेच प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) राज्यात माहिती आयुक्तांची ११ पदे मंजूर नसून शासन निर्णय, दिनांक २१ जून, २०२३ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या सुधारित आकृतीबंधानुसार राज्य माहिती आयोग, मुख्यालय साठी राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे १ पद व राज्य माहिती आयोगाच्या इतर ७ खंडपीठे यासाठी प्रत्येकी १ पद याप्रमाणे राज्य माहिती आयुक्तांची एकूण ७ पदे निर्माण करण्यात आली आहेत. त्यापैकी राज्य मुख्य माहिती आयुक्तांचे १ पद व राज्य माहिती आयुक्त, अमरावती, नागपूर व छत्रपती संभाजीनगर ही ३ पदे रिक्त आहेत.

(२), (३) व (४) राज्य मुख्य माहिती आयोग व राज्य माहिती आयोगाच्या इतर सर्व खंडपीठांकडे ७७,५७७ द्वितीये अपिले प्रलंबित आहेत. सद्य:स्थितीत रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य माहिती आयुक्तांकडे सोपविण्यात आलेला आहे.

राज्य मुख्य माहिती आयुक्तांचे १ पद व राज्य माहिती आयुक्तांची ३ पदे अशी एकूण ४ रिक्त पदे भरण्यासाठी दिनांक १६ सप्टेंबर, २०२४ रोजी जाहीरात प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त झालेल्या अर्जांमधून योग्य उमेदवारांची निवड करण्याकरीता शोध समितीची स्थापना करण्यात आली आहे. सदर समितीमार्फत संक्षिप्त यादी तयार करुन निवड प्रक्रिया पूर्ण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## नवी मुंबईतील खैरणे एमआयडीसी येथील देव इन्फ्रा कंपनीकडून प्रदूषण होत असल्याबाबत

**(२८) * १६१० श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील खैरणे एमआयडीसी येथील भूखंड क्रमांक ऐ-७७५ वरील देव इन्फ्रा नावाच्या कंपनी मध्ये सिमेंट प्रकल्प (प्लांट) सुरू असल्यामुळे त्या परिसरातील व शेजारील कंपन्यातील कामगारांना तसेच तेथून ये-जा करणाऱ्या नागरीकांना या ठिकाणी सतत उडणाऱ्या सिमेंटच्या धुळीमुळे श्वसनाचा त्रास होत असल्याची बाब माहे जानेवारी २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनीचा प्रकल्प (प्लांट) पूर्ण खुला असल्याने येथे मोठ्या प्रमाणात धुळीचे प्रदूषण होत असून कंपनीतून निघणारे सांडपाणी थेट रस्त्यावर सोडले जात असल्यामुळे येथील काम करणारे कामगार व नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्याने स्थानिकांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे संबंधित कंपनीवर कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदर मागणीच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाच्या नियमाचे उल्लघंन करणाऱ्या कंपनीविरुध्द प्रदूषण नियंत्रण मंडळाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे. याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास तक्रार प्राप्त नाही. तथापि, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी नियमित भेटीदरम्यान दिनांक ०२/०१/२०२४ रोजी केलेल्या पाहणीदरम्यान सदर सिमेंट प्रकल्पाच्या हवा प्रदूषण नियंत्रण संयंत्रणेत त्रुटी असल्याचे आढ़ळून आले आहे.
(२) हे खरे नाही. स्थानिकांचा याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे कोणताही तक्रार अर्ज प्राप्त नाही.आरोग्य अधिकारी, नवी मुंबई महानगरपालिका यांचेकडून दिनांक २४/०२/२०२५ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार सदर सिमेंट प्रकल्पामुळे सतत उडणाऱ्या धुळीमुळे श्वसनाचा त्रास होत असल्याचे रुग्ण आढ़ळून आले नाहीत. तसेच, याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त नाही.
(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक ०२/०१/२०२४ रोजी केलेल्या पाहणीदरम्यान सदर सिमेंट प्रकल्पाच्या हवा प्रदूषण नियंत्रण संयंत्रणेत आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने, उद्योगास जल (प्रदूषण व प्रतिबंध) कायदा, १९७४ व हवा (प्रदूषण व प्रतिबंध)कायदा, १९८१ अंतर्गत दिनांक ०३/०१/२०२५ रोजी निर्देश बजावले आहेत.

तसेच, दिनांक ३२/०१/२०२५ रोजी उद्योगास अंतरिम निर्देश दिले असून सदर उद्योगाने निर्देशाचे पूर्णपणे पालन न केल्याने उद्योगास उत्पादन बंदीचे आदेश दिनांक २८/०२/२०२५ रोजी बजावण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## राज्यातील वीज कंपन्यांमधील कंत्राटी कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२९) * ११५६ श्री.योगेश टिळेकर, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महावितरण कंपनीतील नियमित कंत्राटी कामगारांच्या पीएफ व ई.एस.आय.सी. (कामगार विमा योजना) ची रक्कम भरण्यात न आल्याने हजारो वीज कर्मचाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महावितरण कंपनीतील नियमित मंजूर अशा रिक्त पदांवर सध्या २४ हजारांपेक्षा जास्त कंत्राटी कामगार कार्यरत असून सदर कामगारांना शासनाकडून किमान वेतन दिले जाते. या कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीची व कामगार विमा योजनेची रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांच्या खात्यावर भरणा केली जात नसल्याचे आढळून आले आहे तसेच अनेक जिल्ह्यात कामगारांना पूर्ण वेतन दिले जात नाही व काही ठिकाणी बोगस कामगार दाखवून त्यांचे वेतन काढले जात असून, त्यासाठी पतसंस्थेमध्ये बोगस नावांनी खातीही सुरू करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वीज कंपन्यांमधील कंत्राटी कामगारांच्या पीएफ (भविष्य निर्वाह निधी) व ई.एस.आय.सी. (कामगार विमा योजना) च्या कोट्यवधी रुपयांचा अपहार करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाने माहे डिसेंबर २०२४ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने महावितरण कंपनीतील नियमित कंत्राटी कर्मचाऱ्यांची पीएफ व ई.एस.आय.सी. (कामगार विमा योजना) रक्कम कामगारांच्या खात्यावर जमा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

सन २०२४-२५ या कालावधीत महावितरण कंपनीतील सर्व बाह्यस्त्रोत कंत्राटी कामगारांचा पी.एफ व ई.एस.आय.सी.ची रक्कम अदा केली नसल्याची तक्रार प्राप्त झालेली नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) महावितरण कंपनीमध्ये बाहयस्त्रोताव्दारे कंत्राटदार संस्थेमार्फत कंत्राटी पध्दतीवर कामगारांच्या सेवा घेण्यासंदर्भातील निविदा / कंत्राट याबाबतचे सुधारीत निर्देश तसेच कामगारांना वेळेत व त्यांच्या बँक खात्यामध्ये किमान वेतन व अनुषंगिक भत्ते मिळण्यासाठी सुधारीत कार्यपध्दती प्रशासकीय परिपत्रक क्र.५३६ दिनांक ०२/०५/२०१६ अन्वये निर्गमित करण्यात आली आहे. बाहयस्त्रोत कंत्राटी कामगारांची सर्व वैधानिक देणी उदा. भ.नि.नि (PF), कामगार राज्य विमा योजना (ESIC) इत्यादीचा भरणा अदा केल्याची चलने तपासणी केल्यानंतरच बाहयस्त्रोत संस्थेची बिले अदा करण्यात येतात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंपरी (पुणे) येथील इंद्रायणी नदीचे पुनरुज्जीवन निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत

**(३०) * १३४७ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी (पुणे) येथील इंद्रायणीच्या नदीपात्रात मोठ्या प्रमाणात रासायनिक पाणी सोडले जात असल्याने संपूर्ण इंद्रायणी नदी आणि नदीला मिळणाऱ्या इतर नद्याही दूषित होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इंद्रायणी नदी पुनरुज्जीवनाचा सविस्तर प्रस्ताव माहे जुलै, २०२१ मध्ये राज्याच्या पर्यावरण विभागाकडे सादर करूनही तीर्थक्षेत्र देहू आळंदीतून वाहणाऱ्या लाखो वारकऱ्यांचे श्रद्धास्थान असलेल्या इंद्रायणी नदीचे पुनरुज्जीवन निधी अभावी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, इंद्रायणी नदीच्या व इतर नद्यांच्या स्वच्छतेसाठी कार्यवाही करण्याचे आश्वासन मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिले असून सदर आश्वासनानुसार शासनाने इंद्रायणी नदी व इतर नदीला मिळणाऱ्या नद्यांचे होणारे प्रदूषण टाळण्यासाठी तसेच इंद्रायणी नदीच्या पुनरुज्जीवनासाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

इंद्रायणी नदीकाठच्या परिसरातून घरगुती सांडपाणी विनाप्रक्रिया नदीत मिसळत असल्यामुळे इंद्रायणी नदी प्रदूषित होत असल्याचे आढळून येते.

(२) व (३)

• इंद्रायणी नदीचे पुनरुज्जीवन निधी अभावी प्रलंबित आहे हे खरे नाही.
• राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेंतर्गत इंद्रायणी नदी संवर्धनासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांच्याकडून प्राप्त रुपये ५७७.१६ कोटी किमतीचा प्रस्ताव राज्य शासनाच्या दिनांक २२ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या पत्रान्वये केंद्रीय जलशक्ती मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडे सादर करण्यात आला आहे.
• पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या रुपये ५२६ कोटी किमतीच्या इंद्रायणी नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाचा समावेश नगरविकास विभागाच्या अमृत २.० अभियानाअंर्तगत आराखड्यामध्ये करण्यात आला असून सदर प्रकल्प सध्या राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कळमनुरी तालुक्यातील (जि.हिंगोली) पोलीस पाटलांची रिक्त पदे भरणेबाबत

**(३१)** * **१५०७ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यामध्ये सद्य:स्थितीत गावांतील पोलीस पाटलांच्या १४० मंजूर पदापैकी ८२ पदे रिक्त असून, पोलीस पाटलाची भूमिका ही समन्वयाची असल्यामुळे त्यांच्या मध्यस्थीने बहुतांश प्रकरणे गावपातळीवर मिटविण्यात यश मिळत असते, परंतु कळमनुरी तालुक्यातील पोलीस पाटलांच्या रिक्त पदांमुळे गावात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे ग्रामस्थांना मोठ्या प्रमाणात अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गावातील कायदा-सुव्यवस्था सुस्थितीत ठेवणे, वरिष्ठ अधिकाऱ्यांना आवश्यक कागदपत्रे पुरविणे, गावांच्या हद्दीत घडलेल्या गुन्ह्यांची माहिती पोलिसांना कळविणे, पोलिसांना गुन्ह्यांच्या चौकशीत मदत करणे इत्यादी शासकीय कामकाजांवर परिणाम होताना दिसत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी गावातील कायदा व सुव्यवस्था सुस्थितीत ठेवण्याकरीता शासनाने माहिती व निर्णय घेऊन पोलीस पाटलांची रिक्त असलेली पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) कळमनुरी उपविभागामध्ये एकूण १४० पोलीस पाटील याचे पदे मंजूर असून त्यापैकी ८२ पदे रिक्त आहेत.
तथापि, कळमनुरी उपविभागाअंतर्गत माहे जानेवारी, २०२५ वा त्यादरम्यान पोलीस पाटलांच्या रिक्त पदांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन ग्रामस्थाना मोठ्या प्रमाणात अडचणीचा सामना करावा लागत असल्याबाबत कोणत्याही गावामधून निवेदने, पत्र तक्रार किंवा अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झालेले नाहीत.
(३) कळमनुरी उपविभागीय पोलीस पाटील पदाची बिंदुनामावली तयार करुन प्रमाणित करण्याची कार्यवाही सुरु आहे. बिंदुनामावली प्रमाणित होताच वृत्तपत्रात जाहिरात देऊन पोलीस पाटील पदाबाबत भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील प्रदूषण करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत

**(३२) * १५२७ श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीमध्ये अनेक रासायनिक कंपन्यांकडून रात्रीच्या वेळी खरवई, शिरगाव, दत्तवाडी या गावालगत रासायनिक वायू सोडत असल्यामुळे येथील रहिवाशांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असून डोळे चुरचुर करणे, श्वसनाचा त्रास इत्यादी आरोग्याच्या तक्रारी सुरु झाल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कुळगाव बदलापूर नगरपरिषद क्षेत्रात हवेच्या गुणवत्तेचा निर्देशांक १५० पर्यंत असतो परंतु रात्रीच्या वेळेस कंपन्यातून रासायनिक वायू सोडल्यामुळे निर्देशांक ३१४ इतका होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रासायनिक कंपन्यांकडून रात्रीच्या वेळी रासायनिक वायू सोडण्यात येत असल्यामुळे उक्त कंपन्याविरुध्द नियमानुसार कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.तथापि, जिल्हा शल्य चिकीत्सक, मध्यवर्ती रूग्णालय, अंबरनाथ यांचेकडून दिनांक २२/०२/२०२५ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार स्थानिक नागरिकांमध्ये डोळे चुरचुर करणे, श्वसनाचा त्रास, असे एकही रुग्णांने बाहयरुग्ण किंवा आंतररुग्ण म्हणुन या रुग्णालयात उपचार घेतलेले नाही. तसेच रूग्णालयामध्ये विशेष करून प्रदूषणामुळे होणाऱ्या आजाराबाबतचे रूग्ण औषध उपचारासाठी रूग्णालयात दाखल झालेले नाहीत.

(२) हे खरे नाही.दिनांक ०१/१२/२०२४ ते दिनांक २३/०२/२०२५ (एकूण ८४ दिवस) या कालावधीमध्ये हवा गुणवत्ता निर्देशांक (AQI) हा सर्वसाधारणपणे समाधानकारक ते मध्यम या गुणवत्तेत आढळून येतो.

(३)•दिनांक १३/०१/२०२५रोजी मध्यरात्री मे. रिलायबल गॅल्व्हनायझर ॲण्ड फास्टनर्स प्रा.लि. प्लॉट नं. डब्लू -७६ सी, एमआयडीसी, बदलापूर जि.ठाणे या उद्योगाच्या उत्पादन प्रक्रियेमधील क्वेचिंग प्रक्रियेतून ॲसिडीक/वासयुक्त वायू उत्सर्जित झाल्याचे निदर्शनास आले होते. या अनुषंगाने सदर उद्योगास दिनांक १५/०१/२०२५ रोजी प्रस्तावित निर्देश पारित केले व दिनांक २४/०१/२०२५ वैयक्तिक सुनावणी घेऊन दिनांक २८/०१/२०२५ रोजी अंतरिम आदेश देण्यात आले. अंतरिम आदेशाच्या पुर्ततेच्या सदर उद्योगाची दिनांक २५/०२/२०२५ रोजी पाहणी केली असता, उद्योगांने अंतरिम आदेशाचे पुर्तता पूर्ण न केल्यामुळे उद्योगास दिनांक २८/०२/२०२५ रोजी उत्पादन बंद करणेबाबातचे आदेश पारित करण्यात आले आहेत.

•महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून बदलापूर औद्योगिक वसाहतीमधील उद्योगांना नियमीतपणे, तसेच रात्रीच्या वेळेस अथवा प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने भेटी देऊन प्रदूषण नियंत्रण संयंत्रणेची पाहणी केली जाते. पाहणी दरम्यान निर्दशनास आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने संबंधित दोषी उद्योगांवर नियमाप्रमाणे योग्य ती कारवाई केली जाते व त्रुटींच्या पूर्ततेचे अनुपालन होईल याची खात्री महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ करत असते.

•माहे एप्रिल २०२४ ते जानेवारी २०२५ या कालावधीमध्ये ५ उद्योगांना उत्पादन बंदचे आदेश, ५ उद्योगांना अंतरिम आदेश, ५ उद्योगांना प्रस्तावित आदेश व ९ उद्योगांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दिपनगर (ता.भुसावळ, जि.जळगाव) औष्णिक वीज प्रकल्पातील राखेची अवैधरित्या वाहतूक होत असल्याबाबत

**(३३)** * **१५५७ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिपनगर (ता.भुसावळ, जि.जळगाव) औष्णिक वीज प्रकल्पाच्या वेल्हाळे येथील ॲश बंड मधून राखेची चोरी करून अवैधरित्या राखेची वाहतूक होत असून अवजड वाहनामुळे रस्त्यांची दुरवस्था झाली आहे, परिणामी राखेमुळे शेती पिकाचे नुकसान होत असल्याची बाब दिनांक २८ डिसेंबर २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैधरित्या राखेची वाहतूक करणाऱ्या संबंधित दोषीविरुध्द कारवाई करणे संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

अवैधरीत्या राखेची उचल करत असल्याचे आढळल्यास भुसावळ औष्णिक वीज केंद्राकडून वेळोवेळी FIR दाखल करण्यात येते.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१)(कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.